
# शब्दायन



**(मायमराठी या संकेतस्थळाचे ई –मासिक)**

**अंक पहिला जानेवारी २०२१**


**ज्ञानदीप एज्युकेशन अँण्ड रिसर्च फौंडेशन**

१८, ‘ज्ञानदीप’,शिल्प चिंतामणी हौसिंग सोसायटी,विजयनगर, पोस्ट - वानलेसवाडी

सांगली - ४१६ ४१४

## संपादकीय

# शब्दांचा हा खेळ मांडला -

शब्द उगवतात कोठे? मावळतात कोठे? ओठांमधून बाहेर पडतात ते कानी येतात, त्या मार्गाने काही शब्द मनात उतरतात, काही हृदयात बंदिस्त होतात. काही हवेत उडून जातात. एखादा शेतकरी जेव्हा शेतात बियाणे भिरकावतो- तेव्हा त्यातील काही वाऱ्याबरोबर उडून जातात, काही पाण्यासवे वाहून जातात, काही सूर्याच्या उन्हात जळून जातात. मात्र काही मातीच्या गर्भात खोलवर रुजतात आणि मशागतीच्या आधारे कालांतराने अंकुरतात. काहींच्या वेली होतात, काहींची झाडे ! कोणाचे इवलेशे आयुष्य तर काही गंगेच्या प्रवाहातील अक्षय लामणदिवे ! शब्दांचे बियाणे आज आम्ही पेरतो आहोत- अंकुरण्याच्या अपेक्षेने !

शब्दांची भुरळ साक्षात भगवंताला पडली आणि त्याने गीता सांगितली. कोणी शब्दांमधून रामायण, महाभारत रचले. कोणी गीतरामायण शब्दांमधून अजरामर केले तर कोणी गाऊन शब्दांना अजरामर केले. कविता, कथा, लेख, प्रवासवर्णन, व्याख्यान, चित्रपट, नाटक, कादंबरी, शिक्षण सारीकडे शब्दांचा मुक्तसंचार असतो- नारदमुनी सारखा ! शब्दांबरोबर नृत्य,संगीत, शिल्प यासारख्या सर्जक कला विस्तारल्या.

दिवसभरात आपण किती शब्द बोलतो, शब्द ऐकतो, शब्द लिहितो , शब्द पचवतो या साऱ्यांचा एकदा हिशेब मांडला तर शब्दांचे आयुष्य मोजायला मदत होईल.

मायमराठी या संकेत स्थळाच्या वतीने आपण पुन्हा एकदा शब्दांना शरण जातोय. आपला मऱ्हाटी शब्द जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचावा यासाठी जानेवारी २०२१ पासून " शब्दायन " हे ई - मासिक सुरु करतोय. संक्रांतीचा सुमुहूर्त गाठून !

आमच्या आवाहनाला मान देत तत्परतेने आम्हाला लेखन सहकार्य करणाऱ्या साहित्यिक मित्र - परिवाराचे मनःपूर्वक आभार ! संकेतस्थळाचे ई- मासिक हा तसा पहिलाच अंकीय (डिजिटल ) उपक्रम आहे. त्याला आपणा सर्व वाचकांच्या आणि मुख्य म्हणजे शब्दांच्या शुभेच्छा मिळाल्या की हे प्रयत्न सार्थकी लागतील.

भेटत राहू या दरमहा !

विनवणीने सुरुवात केली आहे, विनवणीने संपादकीयाला विराम देतो-

**“तुझा " शब्द दे आकाशाचा!!**

**संपादक -समिती**

# मकरसंक्रमणाचे कृषीपर्व

आकाशात उंच उडणारे पतंग म्हणजे उत्तरायण (गुजरात) तिळगुळाची देवाणघेवाण म्हणजे मकरसंक्रांत,(महाराष्ट्र) शेकोटोभोवती रंगलेले भांगडा नृत्य म्हणजे लोहरी( पंजाब), पवित्र वस्तूंचे पहाटे दर्शन म्हणजे विशु(केरळ),अंगणात पातेल्यात उतू जाणारे दूध आणि सूर्यपूजा म्हणजे पोंगल(तमिळनाडे), लोकनृत्याचा आनंद,शेकोटी आणि तांदळाची पक्वान्ने म्हणजे भोगाली बिहू...(ईशान्य भारत)

.सूर्याचे उत्तरायण घेऊन येतो शेतीशी संबंधित हे आनंद उत्सव!

सूर्याचे उत्तर दिशेला जाणे म्हणजे उत्तरायण.२२डिसेंबरला सूर्य उत्तर दिशेकडे सरकू लागतो आणि हळूहळू उन्हाळ्याची चाहूल लागते. अजूनही पुरेशी थंडी असते त्यामुळे शेकोटीची उब हवीहवीशी वाटते, उष्ण पदार्थ खावेसे वाटतात, उष्णता शोषून घेणारे काळ्या रंगाचे कपडेही अंगांवर दिसू लागतात.महाराष्ट्रात

शेतीच्या ताज्या हंगामात हाती आलेले ऊस, बोरे, सुघडात घालून देवाला अर्पण केले जातात. सुवासिनी एकमेकींना हा वसा देतात.आनंदाची लयलूट करतात."तिळगूळ घ्या गोड बोला" म्हणत सणाचा उत्साह वाढवितात.

सूर्य बारा राशींमधून परिभ्रमण करीत असतोच. पण त्याचे धनु राशीतून मकर राशीत जाणे हे हिवाळी संक्रमणाशी संबंधित आहे.त्यामुळे मकरसंक्रांतीचे विशेष महत्व आहे.

सूर्याचे म्हणजेच तेजाचे, प्रकाशाचे मानवी आयुष्यात अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे सूर्याची उपासना, सूर्यपूजा, सूर्याला नैवेद्य अर्पण करणे या संकल्पना मकरसंक्रांतीच्या निमित्ताने भारताच्या विविध प्रांतात जोडल्या गेलेल्या आहेत.

सूर्य देवतेची उपासना वैदिक काळापासून प्रचलित आहे. गायत्री छंदातील सवितृ देवतेचा असा गायत्री मंत्र जगभरात विख्यात आहेच.रथसप्तमीला अरूणाच्या सारथ्याने सजलेल्या रथात बसून येणार्या सूर्याची पूजा केली जाते.

कालांतराने मकरसंक्रमणाची खगोलीय घटना, कृषीशी संबंधित असलेल्या या उत्सवाच्या संकल्पना यामधे भर पडली आणि देवी पुराणाने संक्रांतीला देवी मानले. जनमानसात ही संकल्पना रूजू लाजली. संक्रांती एखाद्या वाहनावर बसून येते, विशिष्ट रंगाचे वस्र नेसते अशा बाबी तिच्याशी जोडल्या गेल्या. संक्राती हे विशेष व्रतपर्व मानले गेले आणि त्या दिवशी समुद्रस्नान किंवा गंगास्नान करावे अशी धारणा दृढ झाली.संक्रांतीच्या दिवशी तिळाचे वाटण अंगाला लावून स्नान करणे, अंघोळीच्या पिण्यात तीळ घालणे, गुळाच्या पोळीचा नैवेद्य देवाला दाखविणे अशा गोष्टीही रूढ झाल्या.

सारांश, कृषी संस्कृतीशी आणि खगोलीय घटनेशी जोडलेली मकरसंक्रांती देशभरात किंबहुना जगभरातच सण -उत्सव म्हणून मान्यता पावलेली दिसून येते.

शेतीतून हाती आलेल्या पिकाचा, शेकोटीचा आनंद सामूहिकपणे घेणे, चार क्षण सर्वांसह मजेने एकत्र घालवणे आणि भले बुरे विसरून पुन्हा गोड बोलण्याचे प्रेमळ आवाहन करीत नव्या जोमाने कामाला लागणे ही संक्रांतीच्या उत्सवामागची कल्पना आहे. मोकळ्या हवेत रंगीत पतंग उडवताना लोकगीतांचा, लोकनृत्यांचा आनंदही गुजरातेत घेतला जातो. भारतीय संस्कृतीच्या मुळाशी दडलेली आत्मीयता, स्नेहभाव, आदर ही तत्वे जपत संक्रांतीचा आनंद घेऊया.

**-आर्या जोशी**

# शेवटचा दिस....'

खूप वर्षांपूर्वी मी युनियन बँकेच्या सांगली शाखेत मॅनेजर होतो तेव्हा 'मधू कांबळे'माझा स्टाफ मेंबर होता.जवळजवळ चार वर्षे आम्ही एकत्र काम केलेलं.ती जवळीक होतीच.पुढे खूप वर्षं उलटून गेल्यानंतर त्याची अचानक भेट झाली ,तो नुकताच रिटायर झाल्यावर आमच्या 'युनियन बँक निवृत्तकर्मचारी संघटनेचा मेंबर झाला तेव्हा..!त्या मिटींगमधे गुलाबपुष्प देऊन माझ्या हस्तेच त्याचं स्वागत झालं होतं.मिटींग नंतरच्या चहापान कार्यक्रमात तो मुद्दाम माझ्या जवळ येऊन खूप मोकळेपणाने भरभरून बोलला.जुन्या आठवणींची उजळणी झाली.निघायची वेळ झाली तेव्हा मुद्दाम माझा पत्ता/मोबाईल नोट करून घेतलान् .'लेकीचं लग्न ठरलंय.ते झालं की मी खर्या अर्थाने रिटायर झालो म्हणायचं.पत्रिका छापून आल्या की घरी येऊन आमंत्रण देणाराय..' म्हणाला आणि गेला.गेलाच.अगदी अचानक.. अनपेक्षित..!लग्नाच्या तयारीची धावपळ.. उत्साहाच्या भरात तब्येतीकडे झालेलं दुर्लक्ष.. अचानक आलेला लो बीपीचा अॅटॅक..आणि त्याचं त्याच अवस्थेत जागच्याजागी कोसळणं.. ऐकून मला धक्काच बसला.लेकीच्या लग्नाची तारीख हाकेच्या अंतरावर आलेली.. त्याच्यासकट सगळेच लगीनघाईत..घरातलं कामांच्या प्रचंड दडपणातलं आनंदी वातावरण...आणि...अचानक ध्यानीमनी नसताना हा घरचा कर्ताच अचानक गेला..!संपूर्ण घरावर शोककळा पसरली.आम्ही संघटनेचे प्रतिनिधी घरी सांत्वनाला जाऊन आलो.ते आवश्यकहीहोतंच.

दिवसकार्य आवरलं.ठरल्याप्रमाणे संघटनेचे कार्यकर्ते फॅमिली पेन्शनसंबंधीचे फाॅर्म्स घेऊन मधूच्या घरी गेले.ते परतले ते भलंमोठ्ठं प्रश्नचिन्ह सोबत घेऊन...!घरचे सगळे आर्थिक व्यवहार मधूच पहात असे.त्याचे आर्थिक व्यवहार, गुंतवणूकी, नियोजन याबद्दल घरी कुणालाच काहीच माहीत नव्हतं.आपलं अचानक कांही बरंवाईट होईल असं त्याला वाटलं नसणार पण ते तसं झाल्यामुळे एक विचित्र त्रांगडं निर्माण झालं होतं एवढं मात्र खरं..!त्यातूनही मार्ग काढावा म्हंटलं पण घरच्यांना भरपूर शोध घेऊनही आर्थिक व्यवहाराच्या नोंदी वा कागदपत्रे कांहीच सापडलं नाही.बॅंकेतल्याठेवी, नाॅमिनेशन्स,म्युच्युअल फंड, शेअर्स,टॅक्स सेव्हिंग इनव्हेस्टमेंटस् सगळंचअधांतरी..! मुलीचं लग्न पुढं ढकललं असलं तरी जवळचाच मुहूर्त पाहून ते साधेपणानं का होईना लगेच करुन द्यायचं होतंच.पुढे खूप दिवसांनी संदर्भ शोधत हळूहळू सगळं मार्गी

लागलं,तरी तोवर लग्न अक्षरश: कसंतरी उरकावं लागलं आणि त्यासाठी घ्याव्या लागलेल्या पैशांच्या सोंगासाठी नातेवाईकांनी केलेल्या तात्पुरत्या मदतीचं मिंधेपण आलं ते वेगळंच.

'मृत्यू अटळ आहे' हे सर्वज्ञात व सर्वमान्य सत्य! पण आपण ते स्वत:च्या बाबतीत सहजपणे गृहितच धरलेलं नसतं.'जेव्हाचं तेव्हा पाहू'हीच काहीशी बेफिकीर वृत्ती असते बर्याचदा.पण जेव्हाचं तेव्हा पहायला आपण नसणार आहोत हेच नेमकं लक्षात घेतलं जातं नाही.या सगळ्यांची विलक्षण बोचरी जाणीव मला झाली, त्याला मधू कांबळे असा निमित्त झाला.

खरंतर या किती साध्या गोष्टी.तरीही तितक्याच महत्वाच्या.पण मला तरी ते महत्त्व मधू कांबळे गेल्यावर

त्याच्या घरच्यांची ससेहोलपट होईपर्यंत कुठे जाणवलं होतं? आपण तरी आपली बायको, मुलगा,सून याना आपण मनोमन केलेल्या नियोजनाबद्दल सविस्तर कुठं काय सांगितलंय? सांगणं राहू दे,पण एकत्रित नोंद करुन तरी ठेवलंय का?हे विचार मनात आले आणि मी हादरलोच.आपण हे करायला हवं.करायलाच हवं..!

'शेवटचा दिस' यायचा तेव्हाच येणाराय.पण तो येणाराय कदाचित असाच.अचानक.न सांगता.शेवटचा दिस गोड व्हावाच पण तो आपल्यापुरताच नव्हे.आपल्यामागे आपल्या माणसांसाठीही.याकरता योग्य ते नियोजन प्रत्येकाने करायला मात्र हवं.

चारसहा दिवसांच्या प्रवासाची तयारीही आपण अगदी आधीपासून नियोजनपूर्वक करत असतो.मग न परतीच्या प्रवासासाठीची बांधाबांध काळजी पूर्वक करायला नको?त्या प्रवासाला जाताना आपण जे बरोबर नेणार आहोत त्या आपल्या कर्मांचं दस्तावेजीकरण परस्पर झालेलंच असतं.पण आपण आपल्या माणसांसाठी जे मागे ठेवणार आहोत त्याचे दस्तावेजीकरण आपणच निगुतीने नियोजनपूर्वक करायला हवंच.नाही का ?

**- अरविंद लिमये,सांगली(९८२३७३८२८८)**

# सोनेरी सूर्यकिरण

अनुराधा गुप्ते.
स्थळ . पुणे येथील गुप्ते कुटुंबाचे घर.
काळ. रात्र... ९ नोव्हेंबर २००३.
वेळ. ८.३०

आज मला किती तरी दिवसांनी खूप छान वाटत होते. आज कोल्हापूरच्या महालक्ष्मी च्या देवळात संध्याकाळी सूर्य किरण मूर्तीच्या पायाला स्पर्श करून गेले. टीवी वर ते दृश्य बघून मला आनंदाचे भरते आले. कसा काय घडत असेल हा चमत्कार ? माझी महालक्ष्मीवर खूप श्रद्धा आहे. . माझ्या जीवनात पण असा प्रकाश तिच्या कृपेने पुन्हा नक्की पडेल असे मला वाटत होते. दोन वर्षापूर्वी जानेवारीत साध्या तापाचे निमित्त झाले आणि माझा चार वर्षाचा ..खेळकर ..आनंदी प्रकाश मला सोडून गेला. माझे जीवन अंधकारमय करून गेला.

मग ती काळरात्र जणू संपलीच नाही. आम्हाला पुन्हा मूल होईल म्हणून आम्ही दोघांनी खूप वाट पाहिली. देवाला नवस झाले. अनेक डॉक्टर झाले. सगळे सांगत तुम्हा दोघात काहीही दोष नाही ..थोडा धीर धरा. . काही उपयोग झाला नाही.

माझा प्रकाश परत आला नाही.

मग काही मैत्रिणींच्या सांगण्यावरून काही तथाकथित गुरूंचा आशीर्वाद घेतला. खूप पैसा खर्च केला. माझ्या नवऱ्याला म्हणजे इन्स्पेक्टर राहुल गुप्ते यांना हे अजिबात पसंत नव्हते. असल्या बुवाबाजीवर त्याचा अजिबात विश्वास नव्हता.

“आपण दोघेही अजून नुकतेच कुठे तिशी ओलांडली आहे . ...सगळे डॉक्टर सांगतात कि थोडा धीर धरा तर हे वेगवेगळ्या बुवांकडे जायचे काय सुरु केले आहेस ? तू हुषार आहेस ..एका कॉलेज मध्ये प्राध्यापक आहेस ...असा वेडेपणा करू नकोस ..” राहुल मला नेहमी म्हणायचा . तो मोठ्या धीराचा आहे. पण आताशा तो सुद्धा रात्र रात्र झोपत नाही . मधेच रात्री केव्हाही उठतो आणि पोलीस स्टेशन वर जाऊन बसतो. दारूचे प्रमाण पण थोडे वाढले आहे.

मी किती दिवसापासून त्याला म्हणते आहे की आपण स्वामी आनंदजी  केव्हा केव्हा इथे येतात तेव्हा त्यांचे आशीर्वाद घ्यायला जाऊ. पण  हा अजिबात ऐकत नाही.

आज मात्र तो तयार झाला. उद्या सकाळी निवृत्त पोलीस  अधिकारी घोरपडे यांच्या घरीच ते येणार आहेत आणि लोकांच्या प्रश्नाला उत्तरे देणार आहेत ...तुम्ही दोघेही त्यांचे आशीर्वाद घ्यायला या . असे घोरपडे काकांनीच बोलवल्यावर मग तयार झाला. ..सोनारानेच कान टोचायला हवेत. घोरपडे काकूंचा आमच्या दोघांवर खूप जीव आहे. काहीही करून आम्हा दोघांना परत एकदा मूल  होऊ दे असे त्यांना फार वाटते.

राहुलच्या थोडे मनाविरुद्ध आहे हे सगळे ..पण माझ्यासाठी तो काहीही करायला तयार असतो.

नाही म्हणजे तसा वर वर कठोर वाटत असला तरी आतून खूप हळवा आणि प्रेमळ आहे माझा राहुल.

उद्या सुट्टीच टाकतो किवा मग दुपारी उशिरा कामाला जातो असे सांगून गेलाय.

“ उद्या त्या स्वामी आनंद यांची  उलट तपासणीच घेतो ..अगदी पोलीसी खाक्यात ..” जाताना हसत हसत मला सांगून गेलाय.

आता रात्री केव्हा येतोय कुणास ठाऊक ?रात्री केव्हा का येईना ...उद्या सकाळी स्वामीजींना भेटायला मात्र वेळेवर यायला हवा .

****************************************

विक्रम बिडकर .वकील.

स्थळ. कोरेगाव पार्क मधील  बिडकर यांचा बंगला.

काळ. रात्र .९ नोव्हेंबर २००३.

वेळ. ८.३०.

स्वामीजी मला केव्हा काय करायला सांगतील याचा काही नेम नसतो. पण ते माझे सदगुरू आहेत. त्यानी मला विहिरीत उडी मारायला सांगितली तरी मी मारेन. अगदी डोळे झाकून.

कारण मला माहीत आहे कि तसेच काही कारण असल्याशिवाय ते मला काहीही करायला सांगणार नाहीत. संध्याकाळी त्यांचा फलाहार झाला आणि ते बेडरूम कडे निघाले. आता ते समाधी लावतील आणि मग कधीतरी मध्यरात्री थोडावेळ झोपतील. सकाळी लवकर उठून मग योगासने आणि प्राणायाम. मग सकाळी सहा वाजल्यापासून त्यांचा दिवस सुरु होतो. ते चालवत असलेल्या वेगवेगळ्या संस्थाना भेटी ..तिथल्या कामाची बारकाईने पाहणी करतील ..नव्या योजना सांगतील..काही वेळा सकाळी प्रवचने असतात ..नाही तर संध्याकाळी. या वेळच्या पुण्याच्या पंधरा दिवसाच्या मुक्कामात हा असा त्यांचा कार्यक्रम असे.

पण आज बेडरूमकडे जाता जाता ते एकदम थांबले. माझ्याकडे वळून म्हणाले,

" विक्रम मित्रा ...आत्ता आपल्याला जरा बाहेर जायला लागेल. आपल्या सारथी मित्राला जरा गाडी काढायला सांग ....अजयला आज जरा त्रास द्यायला लागणार. . तुला पण बरोबर यायला लागणार .." अजय आमचा विश्वासू सारथी . स्वामीजी सर्वांना नावाने ओळखत आणि ते आपल्या सगळ्या शिष्यांना आपला मित्र म्हणत.

" स्वामीजी आपल्याला कुठे जायचे आहे का ?" मी विचारले. स्वामीजी जरा गंभीर झाले.

" आपली कुठे तरी गरज निर्माण झाली आहे. चला..."

आम्ही मग निघालो . स्वामीजींनी अजयला डेक्कन जिमखान्याकडे गाडी न्यायला सांगितले. सगळ्या प्रवासात स्वामीजी शांत बसले होते. अशावेळी त्यांना काहीही विचारण्यात अर्थ नसतो याची मला आता कल्पना आली होती. मी स्वामीजीकडे जरा विस्मायानेच पाहिले. अगदी बेडरूमकडे निघालेले स्वामीजी असे अचानक बाहेर कुठे निघाले असतील आणि माझे काय काम असावे ? भगव्या रंगाचा पायघोळ अंगरखा ..पिळदार शरीर यष्टी ..जेमतेम पन्नास वर्षाचे स्वामीजी. व्यवस्थित दाढी केलेला चेहरा आणि अगदी बारीक असे कापलेले डोक्यावरचे अजूनही काळे असलेले केस ,. कपाळावर लाल रंगाचा टिळा. हातात एक मजबूत लाठी .माझ्यावर यांनी कृपा कशी काय केली असेल ? माझे पूर्व जन्मीचे काही तरी पुण्य असले पाहिजे .

आम्ही संभाजी बाग सोडून जरा पुढे आलो.

“ अजय ..गाडी थांबव जरा. आम्ही आता जरा येथून चालत जाणार आहोत. तुला जिथे जागा मिळेल तिथे तू थांब . आमचे काम झाले कि तुला आम्ही फोन करू. विक्रम मित्रा चला. आपण जरा इथून चालत जाऊ.” असे म्हणून स्वामीजी खाली उतरले आणि माझी वाट न पाहताच आपल्या नेहमीच्या लगबगीच्या चालीने आपली लाठी जमिनीवर टेकवत चालायला लागले. माझी त्यांना गाठेपर्यंत जरा दमछाकच झाली. प्रयाग हॉस्पिटल असलेल्या रस्त्यावरून आम्ही फर्गुसन कॉलेज रोड कडे निघालो. फुटपाथवरून स्वामीजी पुढे आणि मी लगबगीने मागे असे जात असता एका झाडाजवळ स्वामीजी एकदम थांबले. प्रयाग हॉस्पिटल च्या विरुद्ध बाजूच्या फुटपाथवर . पहिली गोष्ट मला दिसली ती फुटपाथ वर झोपलेली एक स्त्री आणि तिच्या जवळ बसून तिला हलवत असलेली एक दोन तीन वर्षाची मुलगी. असे रस्त्याच्या कडेला बसून भिक मागणाऱ्या बायका आणि त्यांची लहान मुले हे दृश्य मी या बाजूला बरेच वेळा पाहिले होते. काही वेळेला ते फुगे किवा प्लास्टिकच्या पिशव्या विकताना दिसत. ही मुलगी रडत होती आणि आईला हलवत होती.

“ मा घर चलो ना !... मा उठो ना ...” असे काही तरी ती बोलत होती. तेवढ्यात आपटे रस्त्याच्या बाजूने दोन तरुण मोटारसायकल वरून आले. ती स्त्री जिथे झोपली होती तिथे ते थांबले. मागे बसलेला तरूण पटकन खाली उतरला. त्या मुली जवळ जाऊन त्याने तिला उचलले ,

“ चलो बेटा घर चलो..” असे म्हणत तो मागे वळला. त्या मुलीने त्याला विरोध केला आणि ती जोरात रडायला लागली ..

“ मा को ले चलो ना .. मा ..मा...उठो ना ..” असे म्हणत तिने त्या तरुणाला आपल्या दोन्ही हाताने मारायला सुरुवात केली.

स्वामीजी आणि मी जवळ उभे राहून हे पहात होतो.

“ बच्ची को छोडो ..” स्वामीजी थोडे पुढे सरकून म्हणाले. ते आता त्या तरुणाच्या आणि मोटारसायकल वर बसून असलेल्या तरुणाच्या मध्ये आले.

“ घर का मामला है ! आप बीच मे मत बोलो.” तो मुलीला घेतलेला तरूण म्हणाला. पण त्याने त्या मुलीला खाली ठेवले.

“ उसकी मा को उठने दो फिर...” स्वामीजी म्हणाले. ती लहान मुलगी परत आई जवळ गेली.तो तरूण परत त्या मुलीकडे सरकला ,

“ ए गोसावड्या ..समजत नाही का ? या मुलीच्या घरीच घेऊन चाललो आहे ...” तो आता मराठीत म्हणाला.

“ उसकी मा को उठने दो..फिर लेके जाओ...” स्वामीजीनी आपला हेका सोडला नाही .

“ ए चलो जल्दी ..” तो मोटारसायकल वरचा तरूण आता म्हणाला. मला शंका आली कि प्रकरण काही तरी वेगळे आहे.

तेवढ्यात त्या मुली जवळ असलेल्या तरुणाने आपल्या खिश्यातून चाकू काढला तो उघडत तो स्वामीना म्हणाला ,

“ हमारी बच्ची है ! हम क्या करते है ...क्या नही करते है इसमे तुम मत पडो ..” असे म्हणत त्याने चाकू स्वामींच्या दिशेने उगारला.

मी स्वामीना सावध करायच्या आत स्वामींची लाठी फिरली आणि त्यांनी त्या तरुणाच्या खांद्यावर जोरदार प्रहार केला. तो तरूण एकदम किंचाळला आणि त्याच्या हातातून चाकू खाली पडला. आपला खांदा धरून तो तरूण आपल्या साथीदाराकडे गेला आणि ते दोघेही मोटरसायकलवरून पळून गेले.

स्वामीजी मग त्या झोपलेल्या स्त्री कडे गेले. खाली वाकून त्यांनी तिला हाक मारली ..

“ माताजी ..उठो ..ये लोग आपके बच्चीको ले जा रहे थे...” त्या स्त्रीने काहीच हालचाल केली नाही ,तेव्हा स्वामीजीनी आपला हात तिच्या नाकापाशी धरला. मग तिचा हात आपल्या हातात घेऊन तिची नाडी बघितली. आणि ते माझ्याकडे वळून म्हणाले.

“ मित्रा ही तर जिवंत नाही ...पोलिसांना फोन करून वर्दी दे.” मी माझा मोबाईल काढून फोन लावला. दरम्यान स्वामीजी त्या मुलीकडे जाऊन तिच्यासमोर वाकून बसत तिच्याशी बोलू लागले.

“ आप का नाम क्या है बेटा ?..”

“ माला...”

“ ये मा है आपकी ? ...”

“ हा ..ये उठती नही है ...”

“ ये  अब भगवान के पास चली गयी है बेटा. आपके पिताजी कहा है ?”

“ मालूम नही.”

“ ये कौन लोग तुम्हे ले जा रहे थे?”

“ मालूम नही. मा अब भगवानके घरसे कब वापस आयेगी ?”

“ मा वापस नही आयेगी बेटा ..पर वो हमेशा तुम्हारे पास रहेगी....”

“तुम कौन हो ?”

“ हम तुम्हारे दादाजी जैसे है बेटा”

स्वामीजी कधीही खोटे बोलत नसत. लहान मुलांशी तर केव्हाच नाही . काही वेळा ते अप्रिय गोष्टीबद्दल मौन पाळत. या मुलीला काय समजले कुणास ठाऊक पण त्यांचे प्रेम तिला नक्कीच समजले असावे.

आता स्वामीजीं तिच्या डोळ्यातील अश्रू पुसले होते. ती मुलगी सुद्धा आता स्वामीजींच्या बोलण्यामुळे जरा सावरली होती. मी पोलिसात वर्दी देऊन माझा फोन खिशात ठेवला. त्या मुलीकडे मी आता जरा निरखून पहिले. जेमतेम दोन तीन वर्षाची असावी ती. काळसर वर्ण , कृश शरीर, मानेपर्यंत नीट कापलेले केस आता जरा विस्कटलेले  होते ,तोंडावर आणि हातापायावर बरीच धूळ , कानात कसल्या तरी चमकत्या धातूची रिंग ..गुढग्याच्या खालपर्यंत येणारा फ्रॉक...त्याचा मूळ रंग ओळखणे कठीण होते पण तो बराच मळलेला असावा. रस्त्यावरील पिवळसर प्रकाशात तो अजूनच जुनाट आणि काळपट रंगाचा दिसत होता. मुळात बहुदा तो निळा असावा. नाकात एक चमकी सुद्धा होती आणि गळ्यात कसली तरी माळ. मोठी गोजिरवाणी मुलगी दिसत होती. किंबहुना ती तशी दिसावी आणि लोकाना  दया येऊन  तिला भीक द्यावी

अशीच योजना तिच्या आईने केली असावी. पण मला आकर्षित केले तिच्या चमकदार आणि काळ्याभोर डोळ्यांनी. तिच्या आईने तिला काजळ लावले होते पण आता ते पार विस्कटून गेले होते. आपले अश्रुनी डबडबलेले डोळे आपल्या चिमुकल्या हाताने पुसत ती स्वमिजीकडे पहात होती. तिच्या हातातील तीन चार बांगड्या त्या पिवळसर प्रकाशात चमकत होत्या. स्वामीजींनी आता तिला उचलून घेतले .आपल्या भगव्या नीट धुतलेल्या अंगरख्याला धूळ लागेल असले विचार सुद्धा त्यांच्या मनात आले नाहीत .

“ बेटा वो बुरे लोग फिरसे आ सकते है ... हमे यहासे दूर जाना पडेगा ...तुम हमारे साथ चलोगी ? तुम्हारी मा को लेने हमारे मित्र आ रहे है ..” स्वामीजी ममतेने त्या मुलीला म्हणाले.

त्या मुलीने वळून एकदा आपल्या आई कडे बघितले. भिती ...आश्चर्य आणि असल्याच काही भावना तिच्या चेहऱ्यावर उमटल्या. तिचा चेहरा रडवेला झाला. तिने एकदम आईकडे झेप घेतली. स्वामीजींनी तिला आपल्यापाशी ओढून घेतली आणि ती मुलगी कसल्याश्या अनामिक श्रद्धेने त्यांना बिलगली.

स्वामीजी माझ्याकडे वळले आणि म्हणाले,

“ विक्रम मित्रा ..ते गुंड परत यायची शक्यता आहे. आपण आता या मुलीला इथून घेऊन जायला हवे. आपण इथून जवळच असलेल्या पोलीस ठाण्यात जावे हे उत्तम .”

“ चला मग , प्रभात रोड वरच एक पोलीस ठाणे आहे तिथे जाऊ आपण ..”

“ आपला सारथी अजय कुठे जवळ असेल तर त्याला बोलावून घे. म्हणजे आपण लवकर पोहोचू.”

अजय लगेच आला आणि आम्ही ठाण्यात पोचलो. तिथले इन्स्पेक्टर गुप्ते माझ्या ओळखीचे होते. ते आपले काम आटपून घरी जायच्या तयारीतच होते.

“ मी डॉक्टर अनिकेत गुहा. आणि हे बिडकर वकील. ..या लहान मुलीला काही गुंड पळवून नेत होते आम्ही तिला त्यांच्या ताब्यातून सोडवून आणली आहे. आणि तिकडे प्रयाग हॉस्पिटल

पाशी हीची आई मृत अवस्थेत आम्हाला सापडली .त्याची वर्दी बिडकर वकिलांनी नुकतीच कंट्रोल रूम ला दिली आहे. ..”

स्वामीजी म्हणाले.

“ वकील साहेब ..बसा.  हे आपल्या बरोबरच होते का ? आणि हे बंगाली असून इतके चांगले मराठी कसे काय बोलू शकतात. ..” इन्स्पेक्टर गुप्ते जरा गोधाळून म्हणाले.

“ स्वामीजी डॉक्टर आहेत. इथेच पुण्यात बीजे मेडिकल मध्ये ते शिकले आहेत. त्यांना बऱ्याच भाषा येतात. प्रेताबद्दल मी वर्दी दिली आहे. आता या मुलीचे काय करायचे ते पहिले पाहिजे.” मी म्हणालो.

“ या मुलीची वैद्यकीय तपासणी करावी लागेल ..मग तिला बाल सुधार केंद्रात दाखल करू.” इन्स्पेक्टर गुप्ते म्हणाले.

ती मुलगी आता स्वामीजींच्या खांद्यावर झोपून गेली होती. स्वामीजींनी तिला शेजारच्या बाकावर झोपवली. तिने थोडी चुळबूळ केली पण मग लगेच परत झोपून गेली.तिच्याकडे मायेने पहात स्वामीजींनी तिच्या डोक्यावरून हात फिरवला .

“ ती आपले नाव माला असे सांगते आणि ती मृत बाई आपली आई आहे असे म्हणते. आपले वडील कुठे आहेत याची तिला कल्पना नाही. हिंदी बोलू शकते ही मुलगी. तशी या मुलीला काही दुखापत झालेली वरकरणी तरी दिसत नाही .” स्वामीजी म्हणाले.

“ ठीक आहे. वकील साहेब पण आपण या वेळी रात्री इकडे कसे काय आलात? आपले इकडे काही काम होते का ?” गुप्ते साहेबांनी चौकशी केली. माझ्या मागच्या दोन तीन भेटीत एक तरूण आणि कर्तबगार अधिकारी म्हणून गुप्ते मला माहित झाले होते. वेगवेगळ्या साधू आणि बाबाजी या बद्दल त्यांचे मत काही फारसे चांगले नाही याची मला कल्पना होती. पण मी त्यांना या स्वामीजी बरोबरच होतो याची खात्री पटवून दिली आणि ही मुलगी घेऊन आम्ही पोलिसांकडेच आल्याने हे मुले पळवापळवीचे  प्रकरण नसावे  आणि त्यात या स्वामीजींचा काही हात नाही याची त्यांची खात्री झाली. एका चाकू धारी गुंडाला या स्वामीजींनी लाठीचा प्रसाद दिला हे समजल्यावर त्यांना जरा आश्चर्य वाटले.

“ मी इकडे  याच वेळी इथे कसे आलो हे फक्त स्वामीजीच सांगू शकतील ..आम्ही चालत चालत त्या रस्त्यावरून जात होतो तेव्हा हे प्रकरण घडले हेच खरे.” मी गुप्तेना म्हणालो. गुप्तेने स्वामीजींकडे प्रश्नार्थक दृष्टीने पाहिले.

स्वामीजी हसून म्हणाले ,

“ परमेश्वराची इच्छा ... मी  इथे या वेळीच का आलो  आणि या मुलीला त्या गुंडांच्या तावडीतून का सोडवले ...हे काही मी सांगू शकणार नाही . असो .पण ते महत्वाचे नाही ,आता रात्र खूप झाली आहे. आम्ही आता निघतो .या मुलीची योग्य काळजी घ्या .  बिडकर साहेब आपल्या संपर्कात राहतील . या मुलीला योग्य  घर मिळावे अशी माझी  इच्छा आहे.”

हे सगळे प्रकरण संपून घरी परत येई पर्यंत  रात्रीचे  साडे अकरा वाजले होते. स्वामीजी मग आपल्या बेडरूम मध्ये निघून गेले.

रात्री साडे आठ वाजता विश्रांती साठी निघालेले स्वामीजी एकदम मला घेऊन डेक्कन जिमखान्याकडे  का आले याचा मला उलगडा झाला होता .

पण त्या मुलीच्या बाबत आपले काम अजून संपलेले नाही असे मला सारखे राहून राहून वाटत होते.

पुढे काय होणार हे स्वामीजीच जाणे.

*****************************************

इन्स्पेक्टर राहुल गुप्ते.
स्थळ . घोरपडे साहेबांचा बंगला.
काळ. सकाळ . १०,नोव्हेंबर २००३.

वेळ. ८.३० .

साधू आणि बाबा या जमातीवर माझा अजिबात विश्वास नाही. अनुराधाचा आग्रह आणि घोरपडे साहेबांचा शब्द.

“ हे स्वामीजी वेगळे आहेत. तुम्ही एकदाच या. खरे सोने आणि पितळ यातला फरक तुमच्या सारख्या चाणाक्ष पोलीस अधिकाऱ्यापासून लपून राहणार नाही .”

दहा पंधरा मिनिटे थांबायचे आणि निघायचे असे ठरवून आलो आहे. पण एक प्रश्न मनात घोळवत होतो. अनेक संत ज्याचे गोडवे गातात तो सद्गुरु कसा ओळखावा? माझे बाबा म्हणायचे ,” अरे अंतरीची खुणगाठ लगेच समजते ..”

आता हा स्वामी आनंदजी का कोण गुरु आहे तो काय आहे ? आज बघतोच. आम्हा पोलिसांना माणूस बघताच तो किती पाण्यात आहे हे समजते.

मी आणि अनुराधा बरोबर ८.३० वाजता घोरपडे साहेबांच्या बंगल्यात पोचलो. त्यांच्या प्रशस्त दिवाणखान्यात स्वामींचे प्रवचन होते. बरीच गर्दी दिसत होती. दोन मोकळ्या खुर्च्या पाहून मी आणि अनुराधा बसलो. समोर एक छोटे व्यासपीठ केले होते ..त्यावर एकच खुर्ची होती. भिंतीला लागून एका स्टुलावर दत्ताची एक सुरेख मूर्ती होती. त्याच्या समोर एक समई तेवत होती. मूर्ती समोर बागेतील ताजी फुले ठेवलेली होती. मला का कोण जाणे खूप प्रसन्न वाटले. अनुराधाच्या चेहऱ्यावर सुद्धा एक स्मित झळकले. तिने दत्ताच्या मूर्तीकडे पाहून हात जोडले आणि आपले डोळे मिटून ती किती तरी वेळ तशीच बसून राहिली. आमचा प्रकाश गेल्यापासून असे मनापासून स्मित फार कमी वेळाच तिच्या चेहऱ्यावर मला दिसले असेल.

थोड्याच वेळात स्वामीजी भर भर चालत स्टेज वर आले आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. काल रात्री आमच्या पोलीस ठाण्यात हेच आले होते. त्यावेळी त्यानी आपली ओळख डॉक्टर अनिकेत गुहा अशी करून दिली होती. मी काल सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित झालो होतो.

भगव्या रंगाचा पायघोळ अंगरखा ..पिळदार शरीरयष्टी ..जेमतेम पन्नास वर्षाचे असावेत स्वामीजी. व्यवस्थित दाढी केलेला चेहरा आणि अगदी बारीक कापलेले केस. . कपाळावर लाल रंगाचा टिळा.

हातात कालचीच लाठी . आणि मला कालही जाणवलेले शांत पण अथांग असे डोळे.

त्यांनी आल्यावर दत्ताच्या मूर्तीला नमस्कार केला आणि मग स्मित हास्य करत जमलेल्या सर्वाना दोन्ही हात जोडून नमस्कार केला. मग जमलेल्या सगळ्यांचे कडे एक नजर फिरवली. माझ्या कडे आणि अनुराधाकडे पहात जणू त्यांनी आमच्या नजरेला नजर मिळवली ..एक क्षण भरच .मग ते सर्वाना उद्देशून म्हणाले,

" आपले स्वागत आहे. या प्रसन्न सकाळी आज पासून नव्हे या क्षणापासून आपले सर्वांचे जीवन आनंदमयी होऊ दे अशी परमेश्वराचरणी प्नार्थना करून मी आजच्या चर्चेला सुरुवात करतो.आपण दूरदर्शन वर आणि वर्तमानपत्रात नेहमी भोंदू बाबा ना पकडले ..त्यांना शिक्षा झाली अश्या बातम्या वाचत असतो …आपल्या अनेकांच्या मनात एक प्रश्न नेहमी येत असतो …सद्गुरु कसा ओळखायचा ? आज आपण त्यावरच बोलणार आहोत. …"

स्वामीजी आता इंग्रजी मध्ये बोलत होते. माझ्या मनात क्षणभर वीज चमकावी असे झाले. स्वामींना माझ्या मनातील प्रश्न कसा समजला ? ते माझ्याशीच बोलत आहेत कि काय ?

" माझे गुरु ज्यांना मी गुरुजी म्हणतो ते माझ्या मते सद्गुरु आहेत. मला त्यांच्यात काय जाणवले ते मी सांगतो म्हणजे तुम्हाला सद्गुरु कसा ओळखायचा हे कळेल.

पहिली गोष्ट म्हणजे त्यांच्या सानिध्यात गेल्यावर मला काय वाटते ? माझ्या मनात निखळ ,निर्हेतुक आणि उस्फुर्त असा आनंद निर्माण होतो . माझ्या मनात आनंदाचा झरा निर्माण करण्याचे सामर्थ्य सद्गुरुमध्ये आहे हे मला पदोपदी जाणवते.

दुसरी गोष्ट . गुरुजी मला फक्त मार्ग दाखवत नाहीत .. माझा हात धरून मला ते योग्य मार्गावरून चालवतात आणि अनुभव देतात. प्रत्येक क्षणी ते माझ्या बरोबर असतात. आत्ता या क्षणी मी जे तुम्हाला सांगतोय ते मी आताच तुम्हाला का सांगतोय हे मला माहित नाही पण ते त्यांना माहित आहे आणि काही विशिष्ठ हेतूने ते माझ्याकडून तुम्हाला सांगितले जाते आहे ..अशी माझी खात्री आहे.

तिसरी गोष्ट . आपण सगळे परमेश्वराच्या ह्रदयात आहोत आणि तो आपल्या ह्रदयात आहे असा अनुभव ते मला पदोपदी देतात. हा कल्पनाशक्तीचा विलास नाही ..प्रत्यक्ष अनुभव मला माझे गुरुजी देतात.

तर मित्रानो सद्गुरु हा असा असतो ...असा हवा ."

मग स्वामीजींनी या तीन गोष्टीवर सखोल मार्गदर्शन केले. बाकी लोकांना काय समजले कुणास ठाऊक पण स्वामीजी माझ्या मनातील कुशंका एक एक करून नाहीशा करत होते हे मला स्पष्ट पणे जाणवत होते.

माझे सद्गुरु मला मिळाले होते का ? आमच्या जीवनात प्रकाश परत येणार होता का ? हीच ती वेळ होती का ?

आपले प्रवचन संपल्यावर स्वामीजींनी लोकांच्या प्रश्नाची उत्तरे दिली. अनुराधाने माझ्याकडे पहात मला विचारले ,

" तू स्वामींची उलट तपासणी घेणार होतास ना ? तुझे काही प्रश्न असतील तर विचार ."

मी अनुराधाचा हात माझ्या हातात घेतला आणि म्हणालो ,

" मला माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत आणि पुढे येणाऱ्या सर्व प्रश्नांची उत्तरे सुद्धा फक्त हेच स्वामी देऊ शकतील अशी माझी खात्री पटली आहे." अनुराधाने माझ्याकडे आश्चर्याने पाहिले .ती काही बोलली नाही . पण तिच्या डोळ्यात पुन्हा पाणी जमा झाले ..पण हे वेगळे अश्रू होते. समाधानाचे.

मग घोरपडे साहेबांनी आमची स्वामीजींची ओळख करून दिली.

आम्ही दोघेही त्यांच्या पायाशी वाकलो .तेव्हा स्वामीजी आम्हाला अडवत म्हणाले ,

" माझ्या नको या दत्तगुरूंच्या चरणी नम्र व्हा."

मी घोरपडे साहेबाना आमच्या कालच्या भेटीची माहिती दिली. ते हसून म्हणाले ,

" म्हणजे तुमची अगोदरच ओळख झाली आहे तर ...स्वामीजी केव्हा काय करतील कुणास ठाऊक ?"

स्वामीजी नुसतेच हसले आणि त्यांनी मग अनुराधाबरोबर थोड्यावेळ गप्पा मारल्या आणि मग आम्ही घरी आलो.

माझ्या मनात स्वामीजींनी आदराचे स्थान मिळवायला सुरुवात केली होती तरी पण आपल्या खबरी लोकांकडून या स्वामीजी संबंधी  नीट माहिती काढायची मी ठरवले होते.

पण मला जी माहिती मिळाली त्या वरून स्वामीजी एक सिद्ध पुरुष आहेत आणि अतिशय स्वच्छ  चारित्राचे आहेत ,हे प्रत्येकाने मला सांगितले ...आणि मग मला बिडकर वकिलांचा फोन आला . स्वामीजींना मला आणि अनुराधेला भेटायचे आहे ...ते आमच्या घरी केव्हा येऊ दे असे ते विचारत होते.

दुसरेच दिवशी स्वामीजी आणि बिडकर वकील आमच्या घरी आले .

" काही दिवसापूर्वी जी मुलगी मी तुमच्या पोलीस स्टेशन मध्ये घेऊन आलो होतो ..तिला तुम्ही दत्तक घ्यावे अशी माझी तुम्हाला विनंती आहे ..." स्वामीजींनी प्रस्ताव ठेवला .

आणि मग आमच्या जीवनात प्रकाश उजळत दिपाली आमच्या जीवनात आणि घरात आली.

***************************************

दीपाली  गुप्ते.
स्थळ . पुणे येथील गुप्ते कुटुंबाचे घर.
काळ. रात्र... ११ नोव्हेंबर २०१८.
वेळ. ८.३०

काही महिन्या पूर्वी मला मेडिकल कॉलेज मध्ये  प्रवेश मिळाला आणि मला समजेना मी कुणा कुणाचे आभार मानू? आई बाबा म्हणतात माझ्या रूपाने त्यांच्या जीवनात पुन्हा हरवलेला प्रकाश आला. त्यांच्या जीवनात प्रकाश आला कि नाही कुणास ठाऊक पण माझ्या जीवनात आमुलाग्र बदल त्यांच्या मुळे झाला. नाहीतर मी कोणत्यातरी वेश्यागृहात सडत पडले असते. त्यांनी मला दत्तक घेतले ..एका भिकारी ..अनाथ मुलीला .. माझे नाव बदलून मला एक नवी ओळख दिली. आणि पोटच्या मुलीपेक्षा सुद्धा जास्त  माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला. काही वर्षापूर्वी त्यानी मला हे सांगितले आणि तेव्हापासून दररोज त्यांच्या पाया पडल्याशिवाय मी घराबाहेर पडत नाही . काही दिवस मी त्यांची मुलगी नाही हे समजल्यावर मी सैर भैर झाले .

पण मग मलाच माझी लाज वाटली. माझ्या आईने मला जन्म दिला नसेल पण मातृत्वात ती कुठे कमी पडली ? आणि बाबा ? ते तर सावली सारखे माझ्या बरोबर असतात आणि असणार ...

आणि स्वामीजी ..? ते तर माझे दादाजी आहेत, माझे परमेश्वर आहेत . त्यांचे आभार मी काय मानणार ?

माझे भीक मागणे ..फुटपाथवर राहणे .. मला फारसे काही आठवत नाही .

माझी खरी आई सुद्धा आठवत नाही . माझे खरे बाबा तर नाहीच नाही .माझी स्वामीजींनी गुंडांच्या हातून कशी सुटका केली हे आई बाबांनी मला काही वर्षापूर्वी सांगितले होते पण तो प्रसंग मला काही आठवत नाही .

पण एक आठवण मात्र मला कायम होती . ते काय आहे याची मात्र मला संगती लागत नव्हती . मला आईने तो प्रसंग सांगितला आणि मग मला सगळी संगती लागली आणि स्वामीजींची जणू नव्याने ओळख झाली .

तो क्षण जणू मनावर कायमचा कोरला गेलाय .एक भगव्या कपड्यातील स्वामीजी मला सांगत आहेत ,

“ हम तुम्हारे दादाजी जैसे है बेटा”

त्या क्षणापासून कुठेही असले तरी स्वामीजींचे माझ्याकडे लक्ष असे.

सिद्ध पुरुषाच्या तोंडून जे शब्द बाहेर पडतात ते त्रिवार सत्य असतात. त्या क्षणापासून ते माझे आजोबा झाले होते.

मला मेडिकल कॉलेज ला प्रवेश मिळाला हे फोन वर त्यांना मी काही महिन्यांपूर्वी सांगितले. तेव्हा ते परदेशात होते. आणि त्यांनी मला आशीर्वाद दिला आणि ते म्हणाले ,

“ बेटा तुझ्या हातून हजारो लोकांचे प्राण वाचावेत हीच परमेश्वरची इच्छा आहे.”

पण आज इतक्या महिन्यांनी ते पुण्यात आले आणि आल्या आल्या मला भेटायला आले. त्यांची लाडकी नात होते ना मी ! पण मीच का ? अश्या किती तरी मुली आणि मुलांवर त्यांचा वरदहस्त असतो. पण मी किती भाग्यवान ,ते मला भेटायला आले.

त्यांना पाहताच मला रडू आवरले नाही .तेव्हा मला जवळ घेऊन माझे डोळे पुसत ते म्हणाले ,

" हा तुझा दादाजी असताना तू रडतेस का  बेटा ? "

" दादाजी ...परमेश्वर तुमच्याच रुपात मला नेहमी दिसत आला आहे.पण आज किती दिवसांनी तुमची भेट होते आहे म्हणून रडू आले .. तुम्ही आणि माझे आई बाबा असताना मला काय कमी असणार ? " मी म्हणाले आणि मला  परत रडू फुटले ..पुढे काही मला बोलता आले नाही .

जगाचे स्वामीजी पण ,माझे दादाजी नुसतेच हसले आणि मग आईने दिलेले दुध पीत मला आपला  परदेश दौरा कसा झाला ते  किती तरी वेळ सांगत  बसले.

काही वेळाने ते गेले आणि मला आणि आईला आमचे घर त्यांच्या येण्याने पावन झाले असे वाटले.

मग आईच्या कुशीत शिरून मी अनेक वेळा तिला विचारलेला प्रश्न  पुन्हा एकदा विचारला

" आई स्वामीजी त्या वेळो तिथे आले नसते आणि मला त्या गुंडांच्या तावडीतून सोडवले नसते तर  ?" ..आत्तापर्यंत हजार वेळा  मी हा  प्रश्न विचारला असेल.. आई काहीना काही उत्तर देत असे . आमचे भाग्य ,तुझी  पूर्व पुण्याई वगैरे,वगैरे

पण का कोणास ठाऊक ,आज आईने थोडे वेगळे उत्तर दिले. आजचा दिवसच वेगळा होता ना ?

" दीपा मी तुला नेहमी सांगते ना ? या तीन दिवसात  सूर्यकिरण संध्याकाळी महालक्ष्मी च्या मूर्तीला दर वर्षी  स्पर्श करतात .पण हे असे योग्य स्थळी ,योग्य काळी आणि योग्य वेळी व्हावे हे कुणा योजकाने ठरवून तसे मंदिर बांधले म्हणूनच ना ? स्वामीजी तसे योजक आहेत

.योग्य स्थळी ,योग्य काळी आणि योग्य वेळी ते बरोबर तिथे हजर असतात.तुझ्या जीवनात त्या वळणावर ते नेमके पोचले आणि आपल्या सगळ्यांच्या जीवनात प्रकाश आणला.

" माझ्या जीवनातील योजकाला शतशः प्रणाम. त्यांची कृपा आम्हा सर्वांवर अशीच राहो. " मी म्हणाले .

माझी खात्री आहे , स्वामीजी जिथे असतील तिथून म्हणाले असतील ,

" तथास्तु"

***************************************

- **जयंत नाईक**

# जाहिरातीतील स्त्रीप्रतिमा

आजच्या जाहिरातींचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की पूर्वीपेक्षा जाहिरातींचे स्वरूप आता बदलले आहे पूर्वी जाहिरातीत स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू किंवा शो पीस म्हणून दाखवत होते उदाहरणार्थ एखाद्या शेविंग क्रीम ची किंवा ब्लेड ची जाहिरात असेल तर त्यात गरज नसताना स्त्री दाखवली जायची किंवा ड्रिंक्सच्या जाहिरातीत देहप्रदर्शन करणारी स्त्री दाखवली जायची केवळ जाहिरात आकर्षक व्हावी म्हणून स्त्रीचा वापर केला जात होता अजूनही अशा काही जाहिराती सांगता येतील

पण अलीकडे जाहिरातींचे स्वरूप बदलले आहे स्त्रीची चांगली प्रतिमा अनेक जाहिरातीतून दाखवली जात आहे उदाहरण देऊन सांगायचे झाले तर तर व्हिल या कपडे धुण्याच्या पावडरच्या जाहिरातीत स्त्रीला स्वतःचे काम करण्याची प्रेरणा दिली आहे तिला स्वतःच्या पायावर उभं राहण्याचा आत्मविश्वास दिला आहे . दोघं काम करू आणि सुखाचा संसार करू अशी आशादायी वास्तव जाणीव करून दिली आहे . अशीच दुसरी जाहिरात आहे मारी बिस्कीटची त्यात मुलाच्या हातून एक कप फुटतो तेव्हा ती आपल्या मुलाला न ओरडता त्या कपावर सुंदर पेंटिंग करते आणि तिथेच तिला स्वतःचा व्यवसाय करण्याची प्रेरणा मिळते आणि तिचा व्यवसाय जोरदार सुरू कारण ती मारी बिस्कीट खाते . अशा आणखी दोन-तीन जाहिराती सांगता येतील पण मला

एक मजेदार जाहिरात आठवते त्यात एक स्त्री स्वयंपाक घरात नाश्ता तयार करते त्यावेळी प्रत्येकजण घरातील वेगवेगळी फरमाईश करतात आणि त्या स्त्रीला आठ हात येतात आणि ती हे सर्व पदार्थ करते ती जाहिरात एम टी आर या खाद्य प्रोडक्स ची होती . यात स्त्रीला काम करावं लागतं एकाच वेळी ती किती जबाबदाऱ्या पार पडते हे जाहिरातीतून दाखवले आहे . पण यात झालेले स्त्री चे शोषण कदाचित लक्षातच आलेले नाही त्यामुळे स्त्री वरचा अन्याय माझ्यामते स्पष्ट दिसून येतो असो

स्त्री ही केवळ शोभेची वस्तू नसून ती काहीतरी करू शकते असा भाव अलीकडच्या अनेक जाहिरातीतून दिसून येतो मात्र सगळ्या जाहिरातीत तोचतोपणा आल्याचेही मला जाणवते यापेक्षा एक वेगळी जाहिरात मला खूप आवडली . ती जाहिरात सॅनिटरी पॅड्सची आहे . एक मुलगी अग्निशामकदला सोबत आग विझवण्यासाठी आग एका आग लागलेल्या ठिकाणी येते आणि

पिरियड्स चालू असतानाही न घाबरता तिचे काम मनापासून करते कुठलीही शारीरिक अडचण तिला त्रासदायक ठरवत नाही आणि ती थांबत नाही जाहिरात आवडली कारण एक वेगळाच आत्मविश्वास मुलींना ती जाहिरात देऊन जाते आणि वेगळ्या क्षेत्रात मुली आज काम करतात याचं याचे उत्तम उदाहरण आहे ही जाहिरात . अशा वेगळ्या जाहिरातींमुळे स्त्रिया नक्कीच समाजात आत्मविश्वासाने वावरू शकतील . शिवाय एकुणातच पॅड्सच्या जाहिरातीतून मुलींना स्वच्छतेचं शिक्षणच मिळतं असं मला वाटतं . याउलट साबणाच्या जाहिरातीत सर्वच मुली खूप कमी कपड्यात टब बाथ घेताना दिसतात तिथे मात्र त्या नक्कीच शोभेच्या बाहुल्या दिसतात हीच गोष्ट क्रीम्स सौंदर्यप्रसाधने याबाबतीत या बाबतीत घडताना दिसते अशा सर्वच जाहिराती केवळ शोभेच्या बाहुल्या दाखवतात किंवा देहप्रदर्शन करून कस्टमर्स आकृष्ट करून घेतले जातात . एका जाहिरातीत तर अठरा ते वीस वर्षाची मुलगी पाच ते सहा वर्षाच्या मुलीची आई दाखवतात आणि हा साबण वापरल्यामुळे तिचे सौंदर्य अबाधित राहिले असे दाखवतात अशा जाहिरातीत त्या मुलींची आणि जाहिरातदारांची कीव करावीशी वाटते खरच यातून काय साध्य करतात खोटी स्वप्न अनेक जाहिराती दाखवतात आणि मुली त्याला बळी पडतात खरं म्हणजे मुलीनेही अशा जाहिराती करू नयेत

पूर्वी प्रिया तेंडुलकर याची रजनी नावाची एक मालिका होती त्यात प्रिया काम करायला लागल्यानंतर जेव्हा तिला अशा खोट्या जाहिराती करण्याच्या आॅफर्स आल्या तेव्हा तिने स्पष्ट नकार दिला होता ही गोष्ट मला खूप आवडली . एका साबणाच्या पावडरची जाहिरात करताना त्या पावडरचा फेस झालाच नाही तेव्हा प्रसिद्ध आणि महाग पावडर आणून त्याचा फेस त्या जाहिरातीत वापरला होता पण नंतर मात्र तिने अशा जाहिराती टाळल्या तेव्हा पासून प्रिया तेंडुलकर मला खूप आवडू लागली आणि तिची प्रतिमा उजळून निघाली पण अशा फारच थोड्या अभिनेत्री आहेत .

पूर्वी अभिनेत्री आई झाली की बाद समजली जायची . याला छेद देणारी जाहिरात करिना कपूर हिने प्रेग्नंसी मिरवत केली . “प्रेगा न्यूज” ची जाहिरात करताना तिने आपली प्रेग्नंसी लपवली नाही . हा ही बदल मला अतिशय स्वागतार्ह वाटतो .

अशीच एक चहाची जाहिरात . करोना काळात मृणाल कुलकर्णी आपल्या शेजा-याला चहा देते आणि त्याला वेगळं रहायला सांगितलं आहे वेगळं पाडायला नाही . या जाहिरातीतून एक अत्यंत प्रगल्भ , विचारी स्त्री समोर येते .

कोरोनाच्याच काळात एक नितांत सुंदर जाहिरात आली ती कोलगेट पेस्टची . साधारणपणे ७० वर्षांची वृद्धा ( वृद्धा म्हणवत नाही इतकी सुंदर आहे ती ) आपल्या कुटुंबातील सदस्यांना आपल्या बोटातील अंगठी दाखवून सांगते की तिची एंगेजमेंट झाली आहे . हे बोलण्याचा आत्मविश्वास हास्यातून मिळाला आणि हे हसू आहे कोलगेटचे . किती वेगळा विचार दिलाय या जाहिरातीनं . ७० वर्षाच्या स्त्रीला मनासारखं जगण्याचं स्वातंत्र्य ही जाहिरात देते हे मला खूप विशेष वाटलं आणि मनापासून आवडलं .

जेमिनी तेल स्त्रीला छंद जोपासण्याचं स्वातंत्र्य बहाल करते . तर व्हीम बार वापरल्यामुळे भांडी घासायला वेळ कमी लागतो आणि ती स्त्री केक बनवण्याचा व्यवसाय करू लागते . अशा अनेक जाहिरातीतून स्त्री ची प्रतिमा पूर्वी पेक्षा नक्कीच उजळत आहे . स्त्री केंद्रित जाहिराती अलिकडे बघायला मिळतात हे आशादायी चित्र आहे

अर्थात दुसरी बाजू आहेच . केवळ देहप्रदर्शन किंवा शो पिस म्हणून वावरणारी स्त्री सुद्धा आपल्याला दिसते . कारण नसताना स्त्री चा वावर जेव्हा जाहिरातीत केला जातो तेव्हा मात्र ती स्त्रीत्वाचं अवमूल्यन करत असते . उदाहरणार्थ डॉलर बनियनच्या जाहिरातीत हिरो मारामारी करून जिंकतो आणि या बनियन मुळे जिंकलो हे जाहीर करतो तेव्हा हिरॉईन येऊन त्याला बिलगते . अगदीच अनावश्यक अशी ही भूमिका स्त्री चं अवमूल्यन करते .

आज जाहिरातीतील स्त्री प्रतिमा म्हणून जेव्हा आपण विचार करतो तेव्हा आज पूर्वीपेक्षा जाहिरातीत चांगले बदल घडत आहेत . यापुढील काळात अधिक उत्तमोत्तम जाहिराती येतील की ज्यातून स्त्री प्रतिमा उजळेल आणि वेगळेपण उठून दिसेल .

**-ज्योत्स्ना चांदगुडे**

## “मोहल्ला अस्सी" – “विश्वेश्वरा " तुझ्यावरील श्रद्धेचे बुरुज ढासळताहेत !

१९८८-१९९८ या काळातील वाराणशी आणि अस्सी घाटवासीयांचे जीवन दाखविणारा हा चित्रपट आपोआप हाती लागला. राम जन्म भूमी, तत्कालीन राजकारण ढवळून टाकणारे सर्वपक्षीय नेते यांचे उल्लेख, घाटावरील संसद टपरी आणि त्यांत चालणारे हमरी-तुमरीवरचे वाद ! सगळं जुनं जिवंत करणारं.

सोबर पांडेच्या रूपातील "ढाइ किलोवाला " सनी देओल आणि त्याच्या पुढे (सर्व बाबतीत) दोन पावले असणारी साक्षी तन्वर या जोडीने क्षणोक्षणी पडदा जिवंत ठेवलाय. सनी आपल्या प्रतिमेच्या अगदी ३६० अंशातून वेगळा-सप्पक, किंचित बुळा पण धर्मनिष्ठेमुळे आतून कणखर ! " मंदिर वही बनायेंगे " च्या कारसेवेत पोलिसांची गोळी पायावर झेलणारा ! साक्षी ठाम आणि " रोज रामचरित मानस मी ऐहिक काही हवं आहे म्हणून वाचत नाही तर त्यातून जीवनसंगराशी झुंझण्याचं बळ मिळावं म्हणून रामाला प्रार्थना करीत असते. चला , उठा आणि जीवनाशी दोन हात करू या " असं म्हणत मोडू पाहणाऱ्या नवऱ्याला उभं करण्याचं काम करते. पाश्चिमात्त्यांच्या वावटळीमध्ये हात धुवून घेणारे रवी किशन सारखे असंख्य लोक सनीच्या श्रद्धांची मूळं हलवीत अस्सी घाटाच्या अर्थी उचलायला निघालेले ! तिथपर्यंत जिवाच्या निकराने सनी श्रद्धेचा किल्ला लढवत असतो आणि त्याच्या परीने होणारे हल्ले परतवीत असतो. पण एका क्षणी दैनंदिन जीवनाच्या गरजांनी तो ढेपाळतो. पत्नी, आणि मुलांनी किती दिवस "किमान " गरजांवर आयुष्य काढत राहायचं असा त्याला प्रश्न पडतो. घाटावरील व्यवसाय डबघाईला, संस्कृत शिकवणीकडे मुलांची पाठ, हातात अर्थार्जनाची कामे नाहीत म्हणून तो गांजतो आणि प्रवाहपतित होतो. एका पाश्चात्य स्त्रीला पेइंग गेस्ट ( त्याद्वारे आकर्षक मासिक उत्पन्नाचे साधन) म्हणून घरी आणण्याचा प्रस्ताव स्वीकारतो. इतरवेळी सतत पर्यायी उत्पन्नाच्या स्रोतांबद्दल त्याच्या मागे भूण भूण लावणारी पत्नी (आणि ते निमूटपणे सनीगिरी विसरणारे देओल) आता मुळापासून हादरते. घरात आणि आयुष्यात होणाऱ्या बदलांच्या चाहुलींनी भयभीत होते.

भावी विध्वंसक घंटा तिच्या कानी वाजू लागतात. त्यासाठी घरातील पूजेची शंकराची पिंड ( वाराणसीच्या घराघरांचे रक्षण करणारी देवता) हलवावी लागते आणि त्याचवेळी नेमकी ती भंगते. या अपशकुनाने दोघांचे सश्रद्ध बुरुज ढासळतात. ओल्या डोळ्यांनी ते पिंडीचे शांत गंगेत

विसर्जन करतात. दोघांनाही अन्न पाणी गोड लागत नाही. " माझ्या किरकोळ गरजा जीवनातील श्रद्धास्थानांपेक्षा आणि नीती मूल्यांपेक्षा मोठ्या झाल्यात का गं ? किती तडजोड करायची मी ?" असं सनी पत्नीला विचारतो, तेव्हा आपलेही डोळे ओले होतात. सगळीकडे तत्वहीन तडजोडी करणाऱ्या जमाती (विशेषतः राजकारणी ) प्रत्यही आपण बघतोय पण पांडेजी तरी या मंझधार मध्ये मुळांनिशी टिकून राहावेत असं मात्र आपल्याला आतून वाटत राहतं. इकडे श्रद्धाळू पत्नी घाटावरील शंकरवेश धारी माणसाच्याही पाया पडते. गल्लीतील सगळी मंडळी मोठ्या मिरवणुकीने आपापल्या घरातील शिवाच्या पिंडी घाटावर आणतात आणि मनाविरुद्धच्या उच्छादाला, तडजोडींना रान (की घर) मोकळे सोडतात. आता तिथे अभक्ष्य भक्षण आणि पाश्चात्त्यांच्या "लीला " सुरु व्हायला जणू परवाना मिळतो. घाटावरील एक सांगकाम्या काही दिवसांनी "बाबा " बनून परततो आणि सगळ्यांना मिरवणुकीने "ग्यान " वाटत फिरत असतो. काशी क्षेत्राचा चहू बाजूने चाललेला हा  ऱ्हास चित्रपटातील सुज्ञांना जसा खटकत असतो तसाच आपल्यालाही ! मध्येच "सो कॉल्ड " धर्मसंसद राम विरुद्ध महादेव असा निवाडा करताना दिसते. त्यांतील चर्चेत अयोध्या डोकावते, जाती पाती चर्चिल्या जातात. तसेच टपरीवरल्या संसदेत तावातावाने चालणाऱ्या वादांमध्ये एक स्थानिक मुस्लिम कारागीर येऊन आपली बाजू मांडतो आणि " मीही तुमच्यापैकीच एक आहे " अशी शांतवणारी ग्वाही देऊन जातो.

नवी शंकराची पिंड घरी घेऊन आलेला सनी आपल्या पत्नीच्या डोळ्यांमध्ये आनंदाची निरांजने पेटवतो. नव्या जुन्यांची जुळणी होते. आपल्याही डोळ्यांना शांत वाटते. " धरम "च्या ( पंकज कपूरचा) तोडीचा हा चित्रपट ! दोन्ही वाराणशीतील - एक धर्म चाचपतो दुसरा श्रद्धा बळकट करतो.

कल्याणी ताई आमच्या एका व्याख्यानात म्हणाल्या होत्या- " देव आपली परीक्षा पाहात असतो. ११ वाजून ५९ मिनिटांपर्यंत तो मदतीला येत नाही, पण (भक्तांचे) १२ ही वाजू देत नाही."

अस्सी घाटावर शांतपणे दिवे सोडणाऱ्या सनी -साक्षी बरोबर आम्हां पती-पत्नीलाही त्यावेळी कल्याणी ताईंच्या वाक्यामागे साक्षात काशी विश्वेश्वर उभा असलेला जाणवला.

**- डॉ नितीन देशपांडे**

# 'लागेबांधे...'

वेळा सांगून येत नाहीत असं म्हणतात.त्यामुळे येणारा प्रत्येक क्षण ,सुखद असो वा दु:खद तो स्थितप्रज्ञतेने स्विकारावा असं म्हणतात.पण ते शक्य होतंच असं नाही.बर्याचदा नाहीच होत.क्षण दु:खाचा,संकटाचा असेल तर नाहीच.अशीच एखादी अप्रिय घटना पुढे येणार्या संकटातलं गांभिर्य कमी करायला निमित्तही ठरु शकते.नव्हे नियतीनेच या घटनांमागचा कार्यकारणभाव नियत केलेला असतो.फक्त ते आपल्याला माहित नसतं एवढंच.पण समजतं,तेव्हा मनाला होणारा दिलाशाचा स्पर्श, अंगाची लाहीलाही करणार्या,असह्य

चटके देणार्या उन्हात अचानक थंड गारव्याचा शिडकावा करणार्या ओलसर काळ्या ढगासारखा सुखद भासतो.त्याचीच ही गोष्ट!

२०१६ मधे आम्ही पुण्याच्या 'क्वेस्ट टूर्स'तर्फे'सेव्हन सिस्टर्स' टूरला गेलो होतो.आसाम,मेघालय,अरुणाचल करुन आमचा मुक्काम काझीरंगा अभयारण्याजवळच्या एका लाॅजवर होता.टूरचे अकरा दिवस मजेत गेले होते.चाळीस जणांचा मोठा ग्रूप,पण प्रत्येकाला नावाने ओळखण्याइतका जवळ आलेला.आता नागालँड, मणिपूर,त्रिपुरा होईपर्यंत ओळखी अधिक घट्ट होण्यापूर्वीच ती अप्रिय घटना घडली.त्यामुळे आम्ही जवळ आलो खरे पण असे 'समदु:खी' म्हणून..!

कारण काझीरंगाला दुपारचं जेवण आवरुन आम्ही नागालँडसाठी प्रस्थान ठेवलं ती अनपेक्षित अरिष्टाची सुरुवात होती.आम्ही हास्यविनोद, गप्पा,गाणी यात सर्वजण दंग असणातानाच नागालँड बाॅर्डरच्या खूप आधीच एका चेकपोस्टजवळ आमच्या गाड्या अडवण्यात आल्या.टूर मॅनेजर आणि ड्रायव्हर काय झालंय ते पहायला खाली उतरले आणि हताश होऊन परत आले.नागालँड बाॅर्डरपासून आत सर्वदूरपर्यंत सशस्त्रपोलिसांचा बंदोबस्त होता.अचानक सुरु झालेल्या आंदोलनाने उग्ररुप धारण केले होते.त्याच दरम्यान एके ठिकाणी बाॅॅम्बस्फोट होताच १४४ कलम लागू केले होते.यामुळे पुढे जाणं शक्यच नव्हते आम्ही पुन्हा मागे फिरुन काझीरंगाच्या त्याच लाॅजवर आश्रयाला आलो.टूरचा मनसोक्त आनंद घेत असतानाच दूधात मिठाचा खडा पडावा तसं झाल़ं न् सगळ्यांचा आनंद विरजून गेला.इतर सर्वजण अगदी माझी पत्नीसुध्दा स्वत:चं वैषम्य लपवू शकले नव्हते पण मी मात्र स्वस्थचित्त होतो.त्यामागचं खरं

कारण जाणवायला पुढे पुलाखालून बरंच पाणी जायला हवं होतं.पण त्याक्षणी मात्र आमच्यापेक्षाही कितीतरी पटीने टूर मॅनेजरच्यासमोर असंख्य प्रश्न आ वासून उभे असल्याचे मला जाणवले.विचार करण्यात वेळ न घालवता त्याने सगळी सूत्रे तत्परतेने हलवायला सुरुवात केली होती.परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्याने क्वेस्टच्या मॅनेजमेंटशी त्वरीत संपर्क साधला.सविस्तर चर्चा करुन टूर पॅकअप करायचा निर्णय घेतला.अशा अपरिहार्य कारणाने

टूर अर्धवट सोडायला लागली तर करारानुसार टूरकंपनी पैसे परत करायला बांधील नसते.तरीही कंपनीमार्फत आम्हा सर्वांची परतीची मूळ रिझर्वेशन्स कॅन्सल करुन कंपनीखर्चाने लगेचची रिझर्वेशन्स लगोलग करुन दिली गेली आणि हिशोबाने होईल ती बाकी रक्कम प्रत्येकाच्या बँक खात्यावर थेट जमा करण्याचे आश्वासन दिले.(आणि नंतर ते पाळलेही!)

परतीच्या प्रवासासाठी निरोप घेताना ,आनंदाऐवजी असा विरसच सर्व प्रवाशांच्या मनात होता.अर्थात हे अपरिहार्यही होतंच.म्हणूनच सर्वानी मनाविरुध्द का होईना ते स्विकारलंही.

परतीचा प्रवास सुरु झाला,तरी आरती,माझी पत्नी मात्र गप्पगप्पच होती.तिला बोलतं केलं,तर विषय तोच.

"खूप आधीपासून प्लॅनिंग करुन,अॅडव्हान्स बुकिंग करुनसुध्दा काय झालं ते पाहिलंत ना?"ती म्हणाली.

"आपण नागालँडच्या लाॅजवर चेक इन केल्यानंतर कर्फ्यू लागला असता तर काय करणार होतो आपण?उरलेले दिवस आणि पैसे सगळंच फुकट गेलं असतं आणि आपण पुन्हा अधांतरीच.आत्ता आपण सुखरुप आहोत आणि मार्गीही लागलोय हे महत्वाचं.."स्वत:चीच समजूत काढल्यासारखं मी बोललो तरी ते खरंही होतंच.पण नियतीने माझ्यापुरता नियत केलेला या घटनेमागचा नेमका कार्यकारणभाव मलातरी तेव्हा कुठे माहित होता?

आम्ही दोघे अकल्पितपणे खूप दिवस आधीच परत आल्याचं पाहून आमच्या दोन चिमुरड्या नातींच्या उत्साहाला तर उधाणच आलं.त्यांच्या त्या बालसुलभ उत्साहात आमचं ट्रीप अर्धवट राहिल्याचं दु:ख नकळत विरुन गेलं.चहापाणी,बॅगा आवरणं,आणि ट्रीपमधे आलेल्या अडचणीबद्दल सविस्तर सगळं सांगणं यात रात्रीची जेवणंही आवरत आली.गप्पात सून भाग घेत

असली तरी नेहमीसारखी मोकळी वाटत नव्हती आणि सलील,माझा मुलगा कांहीसा गंभीर.माझं जेवण झालं तसं तो जवळ येऊन बसला.

"बाबा,तुम्ही टेन्शन घेणार नसाल तर एक सांगायचं होतं."

"बोल ना,काय झालंय?"

"उदयदादाचा काल कोल्हापूरहून फोन आला होता.पुष्पाआत्याबद्दल"

"तिचंकाय?"मी मनोमन चरकलो होतोच.माझ्या आवाजातली थरथर त्यालाही जाणवली असणाराच...

ती माझी मोठी बहीण.आम्हा लहान भावंडांसाठी तिने खाल्लेल्या खस्तांवरच तर आमचं स्थैर्य उभं राहू शकलं होतं.तरीही स्वत: कांही केल्याचा टेंभा कधी मिरवला नाहीन.उलट आमच्या लहानसहान गोष्टींचंही कौतुक मात्र उदंड.अतिशय मितभाषी, हसतमुख.माझ्या तर विशेष जवळची.तिला कांही झालं असल्याच्या कल्पनेनेच मी कासावीस झालो.

"तुम्ही ट्रीपला गेला होतात. तुम्ही तिकडे काळजी करीत रहाल म्हणून तुम्हाला फोन न करता त्याने काल मला कळवलं होतं."

"झालंय काय पण?"

"आत्याच्या डाव्या हाताचं बोट खूप दिवसांपासून दुखत होतं म्हणे.आधी तिने फार लक्ष दिलं नव्हतं.बोटाला थोडी सूज जाणवली तेव्हा मग डॉ.ना दाखवलं.बरेच दिवस औषध घेऊनही फरक पडेना म्हणून आर्थोपेडिकना दाखवलं. एक्सरेमधे बोटाच्या हाडाला इन्फेक्शन झाल्याचं दिसून झा आलं.आठ दिवसांच्या अँटिबायोटीक्सनंतरही सूज वाढलीच.आता बोटाच्या हाडाचा भूगा होऊन इन्फेक्शन वाढत चालल्याने इतर बोटाना त्रास नको म्हणून बोट कापायचं ठरलंय. दादाने दुसर्या आर्थोपेडिकचं सेकंड ओपिनीयनही घेतलंय आणि दोन दिवसानी सोमवारी ऑपरेशन करायचं ठरलंय."ऐकता ऐकता मी गंभीर झाल्याचं पाहून सलिल बोलायचं थांबला क्षणभर.

"बाबा,आत्ता नऊच तर वाजलेत. तुम्ही फोन करता का आत्याला? बोला तिच्याशी.म्हणजे तिला न् तुम्हाला दोघानाही बरं वाटेल."मी मानेनेच नको म्हंटलं. "मी उद्या कोल्हापूरला जाऊन

येतो.समक्षच भेटतो.त्याशिवाय मलाच चैन पडणार नाही.."मी शांतपणे सांगितलं खरं,पण ती शांतता वरवरचीच होती.आतून मात्र मी तिळतिळ तुटत होतो.रात्रभर डोळ्याला डोळा नव्हता. माझ्यासाठी खस्ता खाल्लेल्या, माझ्यावर उदंड प्रेम करणार्या माझ्या ताईचं माझ्या आयुष्यातलं नेमकं स्थान ती संकटात असल्याचं कळल्यानंतर असं जाणवलं आणि हतबल मी कासावीस होत कूस बदलत राहिलो.तिचं हे दुखणं काय किंवा आॅपरेशनचा निर्णय काय,तिने नेहमीच्याच सहनशीलतेने आणि धिरोदात्तपणे स्विकारला असेलही कदाचित,पण मलाच ते स्विकारता येईना.ट्रीप अर्धवट सोडून यावं लागल्याने मला आधी समजलं तरी.आणखी दोन आठवड्यांनी आलो असतो तर तिचा बोट कापलेला हातच पहावा लागला असता.नुसत्या कल्पनेनेच अंगावर सरसरुन काटाच आला.पण मला आधी समजून तरी उपयोग काय?तिचं बोट मी वाचवू शकणाराय थोडाच?माझ्या हतबलतेने मी अधिकच अस्वस्थ झालो.उलटसुलट विचारांच्या ग्लानीत तरंगत असतानाच माझ्या मिटू लागलेल्या नजरेसमोर सांगलीच्याच डाॅ.परांजपेंचा मला आश्वस्त करणारा चेहरा तरळून गेल्याचा भास मला झाला आणि त्याच ग्लानीत झोप कधी लागली समजलंच नाही.सकाळी उशीरा जाग येत असतानाच नजरेसमोर तरळून गेलेला तो चेहरा आठवला न् मी कांहीतरी सापडल्याच्या आनंदाने  ताडकन् उठून बसलो. मी सावरलोय हे पाहूनसलिललाही बरं वाटलं.

"लगेच चहा घेऊन आवरताय का?कोल्हापूरला जाऊन येऊ ."ही म्हणाली.

"नाही..नको.दुपारनंतरच निघू म्हणजे तिचाही आराम होईल."मी म्हणालो.सकाळी लवकरची अपाॅईंटमेंट घेऊन डाॅ.परांजपेना भेटलो.ताईच्या तक्रारीबद्दल सविस्तर कल्पना दिली.

"मला जखम बघावी लागेल.सगळे रिपोर्टसुध्दा.मगच कांही सांगता येईल."डाॅ.म्हणाले आणि ते योग्यही होतंच.

"पण आज शनिवार.मी दुपारनंतर तिला भेटायला जाणाराय.तिला आणायचं म्हंटलं तर उद्या रविवार.सोमवारी तर आॅपरेशन होणाराय."

डाॅ.आमच्या घराजवळच रहातात.त्यामुळे त्यानी रविवारी घरी आलात तरी चालेल असं सांगितलं.मला तर तो शुभशकुनच वाटला.

दुपारच्या कोल्हापूरच्या भेटीत सविस्तर चर्चा झाली.माझ्या आग्रहाखातर त्यांनी डाॅ.परांजपेना भेटायची तयारी दाखवली.दुसर्या दिवशी माझा भाचा न् सून ताईला कारने घेऊन आले.जखम पाहून त्यानी सगळे रिपोर्टस् नजरेखालून घातले.ते काय बोलणार याची जीवाचे कान करुन वाट मी पहात राहिलो.

"बोट वाचेल.पण आत्ता १००% खात्री देत नाही.आत्ता फक्त ८०%.बाकी २०% माझी औषधं सुरू झाल्यानंतर मिळणार्या प्रतिसादावर अवलंबून असेल.तरीही तुमच्या आर्थोपेडिकना विश्वासात घेऊन हे सगळं सांगा.मला खात्री आहे,आॅपरेशन पुढे ढकलायला ते विरोध नाही करायचे."

डाॅ.परांजपेनी स्वत: तयार केलेलं एक विशिष्ठ तेल रोज बोटाला मसाज करण्यासाठी दिलं.ड्रेसिंग करायची न् मसाज करायची पध्दत,औषधाच्या गोळ्या घ्यायच्या वेळा,सगळं समजावून सांगितलं.ताईच्या सूनेनं ती सगळी जबाबदारी मनापासून स्विकारली आणि पारही पाडली.पुढे जवळजवळ सहा महिने हे प्रोसेस सुरु होतं.कणाकणानं सुधारणा होत अखेर बोट वाचलं..!

त्यानंतरच्या प्रत्येक राखीपौर्णिमेला आणि भाऊबिजेला जेव्हा ताई मला ओवाळते तेव्हा त्या निरांजनांच्या प्रकाशात माझ्याही नकळत माझी नजर तिच्या हातातल्या तबकाखाली लपलेल्या त्या बोटाचा वेध घेत रहाते..!

या घटनेनंतर पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलंय पण ही आठवण मात्र वाहून नाही गेली.जाणं शक्यही नाही.ट्रीप अर्धवट राहून परत यावं लागण्यात माझ्या न् ताईच्या लागाबांध्यातला एक हळवा धागा नियतीने असा अलगद गुंफलेला होता या जाणिवेच्या दिलासा देणार्या गारव्याने मनाला मिळणारं अनोखं समाधान कधीच न विरणारं आहे...!

**- अरविंद लिमये,सांगली. (मोबा.९८२३७३८२८८)**

## मानवी जीवन - एक आनंदयात्रा

मानवी जीवनावर अनेक कवी, लेखक, साहित्यिक, तत्ववेत्ते, शायर, शास्त्रज्ञ व विचारवंतांनी अतिशय सुंदर भाष्य केलेलं आहे, एका शायराने तर अतिशय सोप्या भाषेत जीवनाचे वर्णन केलं आहे. तो

म्हणतो-

"सुबह होती है, शाम होती है,

जिंदगी युंही तमाम होती है |"

तर दुसरा एक शायर म्हणतो की,

"उजालो अपनी यादोंके साथ रहने दो यारो,

ना जाने किस गली में जिंदगीकी शाम हो जाए |"

आपल्या जीवनातील भल्याबु-या आठवणींचा, सुखद व दुःखद स्मृतींचा खजिना प्राणपणाने जतन करूया. आपण जेव्हा आपल्या गतजीवनाकडे सहज वळून पाहतो तेव्हा अशा असंख्य आठवणी

आपल्या मनःचक्षूपुढे तरळू लागतात.

जगद्विख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईनचं एक वाक्य मला खूप आवडतं, तो म्हणतो की,

" भूतकाळापासून शिका, वर्तमानात जगा, आणि भविष्याबद्दल आशा बाळगा. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या मनात निर्माण होणारा का नेहमीच जिवंत ठेवा. यशस्वी माणूस बनण्यासाठी प्रयत्नशील राहा."

जीवनावर केलेलं हे अतिशय सोपं पण तितकंच मार्मिक भाष्य आहे.

मानवी जीवन म्हणजे एक अद्भुतरम्य प्रवास आहे. शायरानं म्हटल्याप्रमाणे

"आदमी मुसाफिर है, आता है, जाता है,

आते जाते रस्तेमें, यादे छोड जाता है |"

मानवी जीवनातील सर्वांत अनमोल गोष्ट म्हणजे आपल्या प्रत्येकाच्या जीवनात येणारे मौल्यवान क्षण!

"आनेवाला पल, जानेवाला है, जानेवाला पल आनेवाला है,

हो सके तो इसमे जिंदगी बिताओ, पल ये जो जानेवाला है |"

आईनस्टाईनचं वर्तमानकाळात जगा या विचारांशी साम्य असलेलीच ही शायरी, अशा असंख्य अनमोल क्षणांच मिळूनच आपलं मौल्यवान जीवन बनलेलं असतं.

अशा संकल्पनेवरही अनेक विचारवंतांनी आपले विचार मांडले आहेत. एक इंग्रजी सुभाषित आहे, त्यात म्हटलंय -

"Age is matter of mind, if you don’t mind, it doesn't matter."

तर एका शायरानं वयावर फारच सुंदर भाष्य केलं आहे-

**"उम्र"**

ये उम्र माना की तू बडी हस्ती है,

जब चाहे तू मेरा बचपन छीन सकती है |

पर इतना गुरूर मत कर तू अपनी हस्तीपर

मुझे भी नाज है अपने मस्तीपर |

है तुझमे इतना दम, तो इतनीसी कर खता,

बचपन तो छीन लिया, बचपना छीनकर बता |

होठोपे हमेशा एक शरारती मुस्कान रखते है,

हम आजभी थोडासा बचपन साथ रखते है |

उम्रका कामही है बढते जाना,

यह कंबख्त दोस्त, और ये खूबसूरत हॅसी ही है,

जो हमेशा हमे जवान रखती है |

मानवी जीवनात जिंदादिली आणि सकारात्मक दृष्टिकोन किती मोलाचा आहे यावर या शायरानं आपल्याला मोलाचं मार्गदर्शन केलं आहे.

सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी हाच संदेश दिला आहे. ते म्हणतात - "परमेश्वरानं आपल्या प्रत्येकाच्या अंतःकरणात एक गोड अन् खोडकर मूल जन्मतःच प्रदान केलेलं आहे. हे जिंदादिल

मूल आपण प्राणपणानं जतन केलं की जीवनाचं ओझं कधीच वाटणार नाही. उलट जीवन म्हणजे एक अद्भुतरम्य आनंदयात्राच वाटेल."

श्री प्रसाद कुलकर्णी यांनी जगण्याचा मंत्र या कवितेतून खूप मोलाचं मार्गदर्शन केलं आहे. ते म्हणतात-

"वय देहाला असतं, मनाला नाही,

मनानं तरूण असणारी माणसं,

कधीच वृद्ध होत नाहीत.

जीवन सुरेल आहे

आपल्याला ते सुरात गाता आलं पाहिजे.

जग सुंदर आहे

डोळ्यात जीव ओतून, ते पाहता आलं पाहिजे

जाणीवांच्या खिडक्या उघड्या ठेऊन जगत गेलं की जगण्याचं कधीच ओझं होत नाही तर जगण्याचं एक सुंदर, सुरेल गीत होतं."

थोडक्यांत काय तर जीवनाकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन किती सकारात्मक आहे, किती जिंदादिलीचा आहे , यावरच तुमच्या जीवनाची यशस्विता अवलंबून असते. एका इंग्रजी सुभाषितात यावर

छान भाष्य केलं आहे.

"It is not aptitude but it is attitude that determines the altitude of your life."

तुमच्या जीवनाची उंची तुमच्या दृष्टिकोनावर अवलंबून असते. मानवी जीवन म्हणजे जणू काही आनंदयात्राच. परंतु या आनंदयात्रेला दुःख, विरहवेदना इत्यादींची एक काळोखी किनारही आहे. आपल्या

पासून दूर जाणारे आपले जिवलग, अकाली काळाच्या पडद्याआड जाणारे आपले स्नेही, मित्र, नातेवाईक जेव्हा कायमचे दुरावतात तेव्हा शिल्लक राहतात फक्त त्यांच्याच आठवणी. शायरांनी यावर

सुंदर भाष्य केलं आहे -

"चमनमे फूल खिलते है, मुरझाने के लिए

और जीवनमे दोस्त और सहेलियाँ भी मिलती है बिछुडनेके लिए |"

"जीवनके सफरमे राही मिलते है बिछड जानेको

और दे जाते है यादे, तनहाईमें तडपानेको |"

परंतु ज्या गोष्टी आपल्या आवाक्यांत नाहीत. निसर्गाच्या किंवा नियतीच्या स्वाधीन आहेत त्या स्वीकारून आपल्याला पुढे जावे लागते. दुःखी मनाला पुन्हा उभारी देण्याचं काम करते सकारात्मक

विचार प्रणाली व त्यावर अवलंबून असते आपली सुखी किंवा आनंदी जीवनप्रणाली कारण-

**"Positive thinking can create miracles, because life is ten percent how you make it and ninety percent how you take it."**

आपल्या जीवनाकडे आपण सकारात्मक दृष्टिकोनातून पाहत गेलो तरच आपल्या जीवनाचा महोत्सव आपण साजरा करू शकतो. माझ्या एका विद्यार्थिनीने मला एक खूप सुंदर मेसेज पाठविला आहे-

**"If you think positively, sound becomes music, movement becomes dance, smile becomes laughter, mind becomes meditation and life becomes celebration."**

जर तुम्ही जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले तर ध्वनीचे रुपांतर संगीतात, हालचालीचे रुपांतर सुंदर नृत्यात, मित हास्याचे रुपांतर गडगडाटी हास्यात, मनाचे स्थित्यंतर ध्यानधारणेत होऊन

जीवनाचा आनंदोत्सव झाल्याशिवाय राहात नाही, म्हणून आनंदयात्री होऊन आनंदाने जगू या.

**- प्राचार्य सुभाष गोविंदराव राजवाळ**

# काव्य दालन

## (वृत्त - *भूपतीवैभव* )

पाहिले कधी ना स्वप्न वेगळे काही
        उंबरा घराचा मुळी सोडला नाही
वाटले असे की एक सारिका व्हावे
        पिंज-यामधे राघूच्या रुणझुण गावे

पण क्षणात ठिणगी चेतवून मज गेली
        जगण्याला माझ्या नवी झळाळी आली
अवचितसे आले वाटेवरती कोणी
        अन आयुष्याची झाली मंजुळ गाणी

नव्हताच कोणता सोस मला नटण्याचा
        मी स्वतः स्वतःचा मार्ग एक जगण्याचा
मज कळले होते नाते काय स्वतःशी
        साक्षात काव्य ते होते हृदया पाशी

मी येथे आले या धरणीवर केव्हा
        गत जन्माची मज ओळख पटली तेव्हा
ही तहान आहे युगायुगांची माझी
        प्रत्येक जन्म हा एक कहाणी ताजी

**- प्रभा सोनवणे**

# तो-

जातो छापील अभ्यासक्रमाच्या बाहेर

काळजी घेतो " मानसिक " आरोग्याची

हळुवार शब्दांनी फुलवतो मने

विकासाच्या फुलांना गंध देतो

त्याला आयुधं लागत नाही -

वन्ही पेटवायला !

तो अनादी आहे- अनंत आहे

त्याच्यावाचून जग शक्य नाही

तो कधी सांदीपनी होतो ,

कधी चाणक्य

तर कधी अब्दुल कलाम

आई तर तो कायम असतोच

पण वडिलपणही अबोलपणे निभावतो

" त्यांच्या" यशाने तो प्रफुल्लित होतो

पण अपयशाने खचून जात नाही

त्याच्या कार्याला निराशा, औदासिन्य

इत्यादींची परवानगी नसते.

"त्यांच्या " मधून तो स्वतःसारखे

काहीजण तयार करतो -

परंपरेचा प्रवाह सुरु ठेवण्यासाठी

त्याला सेवानिवृत्ती नसते

आणि वेळ काळाचे बंधनही
पद -प्रतिष्ठा, नावलौकिक , पारितोषिके
त्याच्या लेखी नगण्य
त्याची झाडे बहरत असतात डौलाने
पिढ्यान पिढ्या
एवढी नोंद त्याला पुरते
जगातल्या प्रत्येकाला
त्याची गरज असते.
तो " विशेष नाम " नसतो,
नसतो एखादा व्यवसाय
तो काळावर नाममुद्रा रेखाटून
चिरंजीव होतो पाना पानांवर
तो असतो - शिक्षक
" गुरु " पदाचे
समाजातील दृश्य रूप !!

**-डॉनितीन देशपांडे**

## क्षण -

प्रदीर्घ प्रवासानंतर आणि
दमवणाऱ्या कष्टांनी थकलेले आपण
उभे राहतो खोलीच्या मध्यावर
किंवा घर- अर्धा एकर , मैलभर, बेट ,देश
तेथे कसे पोहोचलो हे ठाऊक असते
तरीही म्हणतो- " हे माझं आहे "
हा तोच क्षण-
जेव्हा आसपासची झाडे
काढून घेतात त्यांच्या दयाळू फांद्या
पक्षी माघारी नेतात त्यांचे मधुर गुंजन
विदीर्ण सुळके ध्वस्त होतात
झुळूक हवेची ओहोटीला लागते
आणि आपण कासावीस होतो
खरं तर ते सगळे कुजबुजत असतात-
तुझे काही नाही ,नव्हते
तू फक्त प्रवासी- वारंवार येणारा
पहाड चढून झेंडा रोवणारा, आरोळी ठोकणारा
आम्ही तुझे नव्हतोच
तुला आम्ही सापडलो नाही
प्रत्यक्षात  हे सगळं अगदी उलटं आहे !!

- **डॉ नितीन देशपांडे**

## ........क्षण..........

संध्या जेव्हा ढळू लागते
        हळूच येते चंदा राणी
काळोखाच्या गर्भामधुनी
        जन्मा येते एक विराणी
अंधार फुलत राहतो असा
        उमलत असते एक कहाणी
स्वप्नामधून येते तेव्हा
        नभांगणी त्या शुभ्र चांदणी
रात्रीचे ते शांत शांत क्षण
        खेळ खेळती तारे वारे
नक्षत्रांची आरास जणू
        नटून थटून आले सारे
क्षणात उजळे आसमंत हा
        चंद्र चांदण्या झगमग करती
दूर सारून तमास आता
        नभांगणी ते चमचम करती
कुणी अनामिक एकाकी जो
        चांदणराती उदास होतो
क्षणाक्षणाला आठव येता
        मुठीतुनी क्षण निसटत जातो

**-ज्योत्स्ना चांदगुडे**

## मकरसंक्रात

नववर्षारंभी सण

मकर संक्रांतीचा

आकाशी रंगबिरंगी

पतंग उडवण्याचा

स्नेह, आपलेपणा

प्रतिक याचे असे

तीळ गुळ गोड गोड

असावे शब्दही असे

हळदी कुंकू समारंभ

स्नेह मेळे गृहिणींचे

भेटवस्तू देणे घेणे

संक्रांतीचे हो लेणे

भेटू एकमेका सारे

तीळ गुळ देऊ या

सदाच गोड बोलणे

संकल्प हाच करू या

**अरुण वि.देशपांडे - पुणे**

**मो- 9850177342**

# मैत्री

छान योग किती आला

तुझ्या भेटीने मनाला

अनुभव छान आला

भेटशी आता रोजला ।।१।।

मैत्री नाते आहे असे

ज्याच्याशी हे जुळते

त्यालाच ते कळते

मैत्रीत काय असते ।।२।।

नाती असतात सेतू

मने जुळवणारी

धागा असते मैत्री

मन मैत्री जपणारी।।३।।

दीप अंतरी सदा

मैत्रीचा तेवत राहो

प्रेम ज्योतीत या

मने उजळत राहो।।४।।

**अरुण वि.देशपांडे - पुणे** **मो- 9850177342**

लेकरा संगती

उभा ठाके पांडुरंग

अक्षरामधुन

मज भेटे पांडुरंग

विठ्ठल विठ्ठल

नाचे बागडे सोबती

बोबड्या बोलात

गीता वेद पांडुरंग

दु:ख वेदनांचा

चाले सदा लपंडाव

करूणा सागर

मज भासे पांडुरंग

स्नेहाच्या वनात

राहे नित्य अंतरात

कर्म उपासना

तिथे पावे पांडुरंग

**- अशोक देशमाने (विठ्ठदास)**

**स्नेहवन पुणे(8796400484)**

# बाहुली

इवल्याश्या डोळ्यात मावेल तेवढं आकाश,

स्तिमित होऊन बघत स्वप्ने विणायला सुरवात करते,

ती इवलीशी बाहुली स्वतःला या जगात रुजवू पाहते,

दुडदुड पावलांनी, अवखळ बोलांनी साऱ्या घराला चैतन्य देते,

गोड बोलण्याने मायेच्या बंधाने अवघ्या जगाला बांधून ठेवते,

त्या सुरवंटाचं फुलपाखरु होतांना मात्र आईच्या हृदयाचा ठोका चुकवते,

छोट्याशा कोकराचं मुग्ध कळीतलं रूपांतर खरंतर खूप सुखावह असतं,

पण आपलं लेकरू मोठं झालं म्हणून आईबापाचं काळीज गलबलतं.

दिल्या घरी सुखी रहा म्हणता म्हणता काळजाचा ठेवा हारवल्यागत होतं,

नवी स्वप्ने जोपासतांना जुनी नाती जपण्यासाठी पिल्लू पण धडपडत राहतं.

बायको,सून,आई अशी अनेक नाती निभवतांना पिल्लू  मोठ्ठ होत जातं

पण आईबाबांच्या डोळ्यापुढे मात्र बाहुलीचंच रुप दिसतं असतं.

**-अनघा जगदळे**

# शहाणपण आणि वेडेपण

शहाणपण....
जे दाखवून दिसत नसतं
असलं की लपत नसतं
गरीब बिचारं वेडेपण
नेहमीच ज्याचा मान राखतं
शहाणपण जेव्हा अपमान करतं
वेडेपण तेव्हा हसू फुलवतं
शहाणपणाच्या चौकोनी खिडकीतून
हसरं, वेडं चांदणं अलगद निसटतं
शहाणपण जेव्हा अति होतं
वेडेपणाचं रूप घेतं
वेडेपण जेव्हा शब्दाला जागतं
शहाणपणच झुकून सलाम करतं
कोणतं शहाणपण, कसलं वेडेपण
आपलं आपणच ठरवून घ्यावं
शहाणपणानं कधी हळुवार
वेडेपणाला सांभाळून घ्यावं
वेडेपणानं आपुलकीनं
शहाणपणाच्या कुशीत शिरावं
त्याच्या मनावरचं ओझं
गोड हसत हलकं करावं

**-रमा देशपांडे**